## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ ची साक्ष

## निशाणी क्र.२२

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – आसाराम सोनु वाडीले,

वय – ६३ वर्षे,

व्यवसाय – सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक,

सध्या राहणार – शिरपुर, ता. शिरपुर, जि. धुळे.

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. दि. ०१.०६.२०१८ रोजी मी दोंडाईचा पोलीस ठाणे येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. ठाणे अंमलदार साळुंके यांनी गु.रं. क्र. ४९/२०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास माझ्याकडे सोपविला होता. तपासाचा आदेश लेखी होता. (आता साक्षीदारास गुन्हयाचा तपासाबाबतचा लेखी आदेश दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आालेला आदेश तोच आहे. त्याच्यावर ठाणे अंमलदार साळुंके यांची सही आहे. ती समक्ष केली असल्याने मी ओळखतो. सदर आदेशातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर आदेशास **नि. २३** देण्यात येते.)

०२. दोंडाईचा ते शिंदखेडा रस्त्यावर ॲपे रिक्षा व बस यांचेमध्ये अपघात झाला होता. त्यासंदर्भात गुन्हा दाखल झालेला होता. फिर्याद दुर्गाबाई जयभीम सोनवणे यांनी दिली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर मला फिर्याद प्राप्त झाली होती. त्यावर मी घटनास्थळी गेलो व दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. पंचनाम्याची तारीख ०२.०६.२०१८ अशी होती. पंचांचे किशोर पाटील असे होते. दुसऱ्या पंचांचे नाव देखील किशारे होते. घटनास्थळ शिंदखेडा ते दोंडाईचा रस्त्यावर हाते. बसने ॲपे रिक्षाला ठोस मारुन अपघात केला होता असे घटनास्थळावर आढळुन आले होते. घटनास्थळ फिर्यादीच्या पतीने दाखविले होते. घटनास्थळावर चीज वस्तु आढळुन आली नाही. घटनास्थळाच्या पुर्वेस व पश्चिमेस दोंडाईचा

ते शिंदखेडा रस्ता होता. तसेच उत्तर व दक्षिणेस शेती होती. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. सदर पंचनाम्यावर माझी व पंचांच्या अशा सहया आहेत. पंचांनी त्या माझ्यासमक्ष केल्याने मी ओळखतो. पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर घटनास्थळ पंचनाम्यास **नि. २४** देण्यात येते.) पंचनामा केल्यानंतर मी साक्षीदार तपासले. मी साक्षीदार गोपाल अरुण मराठे याचा जबाब नोंदविला होता. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील साक्षीदार क्र. २ गोपाल अरुण मराठे याचा जबाब दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला जबाबातील अधोरेखांकित ब प्रमाणे सदर साक्षीदार गोपाल अरुण मराठे याने माझ्यासमक्ष तपासादरम्यान कथन केले होते. (करिता साक्षीदार क्र. २ गोपाल अरुण मराठे याच्या जबाबातील अधोरेखाकिंत 'ब' यांस **नि. २५** देण्यात येते. ) तसेच, मी प्रविण गोरख बैसाणे याचा जबाब नोंदविला होता. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील साक्षीदार क्र. ३ प्रविण गोरख बैसाणे याचा जबाब दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला जबाबातील अधोरेखांकित 'अ' प्रमाणे सदर साक्षीदार प्रविण गोरख बैसाणे याने माझ्यासमक्ष तपासादरम्यान कथन केले होते. (करिता साक्षीदार क्र. ३ प्रविण गोरख बैसाणे याच्या जबाबातील अधोरेखाकिंत ब यांस **नि. २६** देण्यात येते. )

०३. मी आरोपीला ४१–अ प्रमाणे नोटीस दिली होती. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणेची नोटीस दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली नोटीस तीच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर नोटीसीस **नि. २७** देण्यात येते.) तपासादरम्यान मी साई ऑटो गॅरेज वाल्यांकडून ॲपे रिक्षाची तपासणी करुन घेतली व बसची तपासणी एस. टी. महामंडळाकडून करुन घेतली. बस तपासणी करुन घेण्याकरीता दोंडाईचा बस आगार प्रमुखांना पत्र दिले होते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेले पत्राची स्थळप्रत ही त्याच पत्राची आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर आगार प्रमुख यांना दिलेल्या पत्राचे स्थळप्रतीस **नि. २८** देण्यात येते.) यांत्रीकी तपासणी अहवालात काय होते हे माझ्या लक्षात

नाही. त्यानंतर मी आरोपीस मो.वा.का. कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील मो.वा.का. कलम २०९ प्रमाणेची नोटीस दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली नोटीस तीच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर नोटीसीस **नि. २९** देण्यात येते.) मी ॲपे रिक्षा तपासणी संदर्भात साई ऑटो गॅरेज यांना पत्र दिले होते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेले पत्राची स्थळप्रत ही त्याच पत्राची आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर साई ऑटो गॅरेज यांना दिलेल्या पत्राचे स्थळप्रतीस **नि. ३०** देण्यात येते.) त्यांच्या अहवालामध्ये काय नमुद होते हे मला आता सांगता येणार नाही. पुढे मी दुखापतींचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले. (प्रस्तुत गुन्हयातील वैद्यकीय प्रमाणपत्र हे आरोपीतर्फे मान्य केले असल्याने त्यास **नि. क्र. ३१** देण्यात येते. ) आता मला दाखविण्यात आलेले नि. क्र. ३१ कडील प्रमाणपत्र हे तेच आहे. जप्त करण्यात आलेली ॲपे रिक्षा ही चालकाच्या ताब्यात परत देण्यात आली. (आता आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील वाहन ताबा पावती दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली ताबा पावती तीच आहे. त्याच्यावर माझी व ॲपेर रिक्षा चालकाच्या सहया आहेत. वाहन ताबा पावतीतील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता वाहन ताबा पावतीस **नि. ३२** देण्यात येते.) ॲपे रिक्षा ताब्यात देतांना तिचे फोटो काढण्यात आले होते. (आता आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील तीन फोटो दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेले फोटो हे तेच आहेत. (सदर तीन्ही फोटोंना ओळखीकरीता **आर्टीकल अ, ब व क** देण्यात येते. ) तपासादरम्यान घटनास्थळावर बसचे फोटो काढण्यात आले होते. (आता आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील तीन फोटो दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेले फोटो हे तेच आहेत. (सदर तीन्ही फोटोंना ओळखीकरीता **आर्टीकल ड, इ व फ** देण्यात येते. ) तपास पुर्ण झाल्यावर आरोपीविरुध्द पुरावा गोळा झाल्याने त्याचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकेन. आरोपी आज रोजी न्यायालयासमक्ष हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

(मध्यांतरामुळे उलटतपास तहकुब.)

मध्यंतरानंतर साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. पाटील यांचे मार्फत.

०४. हे म्हणणे खरे आहे की, दोंडाईचा ते शिंदखेडा हा रस्ता राज्य महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्ता राज्य महामार्ग असल्याने त्याच्यावरुन बरीचशी लहान मोठी वाहने ये जा करीत असतात. सदर कामी मी बस कंडक्टर याचा जबाब नोंदविला होता किंवा कसे हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत कामी फिर्यादीचा मुळ जबाब दोषारोपत्रासोबत न्यायालयात सादर केलेला नाही. मी स्वतःहुन सांगतो की, छायांकित प्रत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघातात जखमी असलेल्या व्यक्तीचा जबाब नोंदविण्यापुर्वी डॉक्टरांची अनुमती घेणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातातील अॅपे रिक्षाचे कोणतेही नुकसान झालेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, अपघातामध्ये सर्व साधारणपणे ज्यावेळेस एखादे मोठे वाहन दुसऱ्या छोटया वाहनास धडकते तेव्हा छोटया वाहनाचे मोठया प्रमाणावर नुकसान होते. तपासादरम्यान एस. टी.च्या काचा फुटल्याचे निष्पन्न झाले होते किंवा कसे हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दोंडाईचा शहरामध्ये दोंडाईचा ते शिंदखेडा वाहतुक करण्याकरीता अॅपे रिक्षांचा थांबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दोंडाईचा शहरामध्ये तसा थांबा नसल्याचे मी खोटे कथन करीत आहे.

०५. घटनेच्या वेळेस बसच्या पुढे एक डंपर चालत होता अशी बाब तपासादरम्यान निष्पन्न झालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, बस चालकाने स्वतःहुन अॅपे रिक्षा चालकाविरुध्द खबर दिली होती अशी बाब तपासादरम्यान निष्पन्न झालेली होती. हे म्हणणे खरे नाही की, अॅपे रिक्षा चालक हा क्षमतेपेक्षा अतिरिक्त प्रवासी त्याच्या रिक्षातुन नेत असल्याने त्याचे नियंत्रण सुटुन अपघात झाल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार गोपाल अरुण मराठे व प्रविण बैसाणे हया साक्षीदारांच्या जबाबातील नि. क्र. २५ व २६ कडील अधोरेखांकित भाग त्यांनी सांगितल्याप्रमाणे नोंदविल्याचे मी खोटे कथन करीत

आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व सामान्यपणे लहान व मोठया वाहनांमध्ये धडक झाल्यास मोठया वाहनाच्या चालकावर गुन्हा दाखल करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास करुन आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयासमक्ष खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.03.23 16:47:02 +0530

दिनांक : २०/०३/२०२६ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | जी. एस. अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | - | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | २३.०३.२०२६. |

स्वाक्षरित/-

लघुलेखक (श्रेणी-३)